ePaper
उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत एनडीएकडून डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यावर मोठी जबाबदारी
| वर्ष - 9 | अंक -19 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™



## आतील पानांत

- मी कुंबळेसमोर रडलो :ख्रिस गेल
- शेतकऱ्याचा मुलगा ५० कोटींचा मालक!
- ट्रम्प यांच्या प्रश्नावर झकरबर्ग भांबावले
- सोशल मीडिया बंदीविरोधात आंदोलन

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 9 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

दोन दसरा मेळाव्यांकडे राज्याचं लक्ष | ठाकरेंना शिवाजी पार्कची प्रतीक्षा

# जरांगेंची अंतरवलीत फुल्ल तयारी!

**मनोज जरांगे यांचा दसरा मेळावा होणार, उद्धव ठाकरे यांना शिवाजी पार्क मैदानाची परवानगी अद्याप मिळालेली नाही**

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे राजकीय वर्तुळात मोठ्या घडामोडी घडत आहेत. जमेल त्या मार्गाने जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न केला जात आहेत. येणाऱ्या दसऱ्याला तर अनेक राजकीय पक्ष आपली ताकद दाखवून कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मराठा आरक्षणासाठी नुकतेच उपोषणाला बसलेले मनोज जरांगे यांचादेखईल यावेळी मोठा दसरा मेळावा होणार आहे. तर दुसरीकडे दरवर्षीप्रमाणे उद्धव ठाकरे हेदेखील आपल्या दसरा मेळाव्याची तयारी करत आहेत. या दोन्ही दसरा मेळाव्यांत राज्याच्या राजकारणाची पुढची दिशा ठरवली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळेच आता या दोन्ही दसरा मेळाव्यांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.



### मनोज जरांगेंची मोठी घोषणा

मनोज जरांगे यांच्या उपोषनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करून मराठा समाजाच्या व्यक्तीला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठीची प्रक्रिया सोपी केली आहे. त्यामुळे आता मराठवाड्यातील संपूर्ण मराठा समाज आरक्षणात जाणार असल्याचा दावा मनोज जरांगे करत आहेत. लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील मराठादेखील आरक्षणात जाईल, असेही ते सांगत आहेत. 8 सप्टेंबर रोजी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना त्यांनी आपल्या याच भूमिकेचा पुनरूच्चार केला. तसेच गेल्या वर्षाप्रमाणेच या वर्षीदेखील आपला दसरा मेळावा होईल, असे जरांगे यांनी जाहीर केले. त्यांनी या दसरा मेळाव्यासाठी तयारीला लागा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. त्यामुळे आता जरांगे या दसरा मेळाव्यात नेमकं काय बोलणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

दरवर्षी उद्धव ठाकरे यांचा मुंबईतील शिवाजी पार्कवर मोठा दसरा मेळावा होतो. या दसरा मेळाव्याला राज्यभरातील शिवसैनिक मुंबईत दाखल होतात. गेल्या वर्षी ठाकरे यांचा मेळावा हा शिवाजी पार्कवर तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दसरा मेळावा आझाद मैदानावर पार पडला होता. या वर्षीदेखील शिरस्त्याप्रमाणे ठाकरेंच्या शिवसेनेकडून जानेवारी 2025 मध्येच दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानासाठी परवानगीसाठी अर्ज करण्यात आला आहे. मात्र अजूनही ठाकरेंच्या शिवसेनेला शिवाजी पार्क मैदानाची परवानगी मिळालेली नाही. 2 ऑक्टोबर रोजी दसरा असून दरवर्षी या दिवशी शिवसेनचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवर पार पडतो. जानेवारी महिन्यात अर्ज केल्यानंतर ठाकरेंच्या पक्षाकडून जवळपास तीन वेळा परवानगीबाबत स्मरणपत्र देखील पालिकेला देण्यात आलं आहे. मात्र यावर पालिकेकडून काहीच उत्तर आलं नसल्याची माहिती आहे. त्यामुळे आता ठाकरेंना या मैदानाची परवानगी मिळणार का? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.



## संपूर्ण मराठवाडा आरक्षणात जाणार

पुढे बोलताना त्यांनी सरकारने काढलेल्या शासन निर्णयावर भाष्य केले. सरकारच्या या निर्णयामुळे संपूर्ण मराठवाड्यातील मराठा हा आरक्षणात जाणार आहे. या निर्णयामुळे मराठ्यांचा फायदा होणार आहे. मी खचणार नाही. काही चूक झाली तर आणखी लढा द्यायला मी तयार आहे. सरकारचे काही चुकले तर सुधारित जीआर काढावा लागेल, असे आम्ही तेव्हाच कबूल करून घेतले होते, असे जरांगे यांनी स्पष्ट केले.

### नोज जरांगेंची मोठी घोषणा! मराठा बांधवांना थेट तयारीला लागण्याचा आदेश; आता नवी मोहीम

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे यांनी मुंबईत जाऊन पाच दिवस उपोषण केले. या उपोषणादरम्यान त्यांना पाठिंबा देण्यासाठी हजारो मराठा बांधून थेट मुंबईत धडकले होते. अपेक्षेपेक्षा जास्त आंदोलक मुंबईत गेल्यामुळे संपूर्ण दक्षिण मुंबई बंद पडली होती. प्रमुख रस्त्यांवर मराठा मोर्चेकरी दिसत होते. त्यानंतर सरकारनेही नमते घेत हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन निर्णय जारी केला. मराठ्यांचा हा मोठा विजय असल्याचा दावा मनोज जरांगे यांनी केला आहे. दरम्यान, आता हे उपोषण यशस्वी झाल्यानंतर आता जरांगे यांनी मराठा बांधवांना एक महत्त्वाचा आदेश दिला आहे. त्यांनी समस्त मराठा बांधवांना तयारीला लागा असा आदेशही देऊन टाकला आहे.

### नेमकी काय घोषणा केली आहे?

मनोज जरांगे यांनी आज नारायण गडाला भेट दिली. यावेळी गुलाल उधळीत त्यांचे स्वागत करण्यात आले. गडावर जाऊन दर्शन घेतल्यानंतर त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी सरकारच्या शासन निर्णयामुळे मराठा समाजाच्या लेकरांचे कल्याण होणार आहे, असे सांगितले. तसेच आमचा यावेळी दसरा मेळावा होणार आहे, अशी घोषणाही त्यांनी केली. यावेळी त्यांनी मराठा बांधवांना जोमात तयारी लागा आणि दसरा मेळाव्याला जास्तीत जास्त संख्येने या असेही आवाहन केले.

### 100 टक्के दसरा मेळावा करायचा

या वर्षी दसरा मेळाव्याची तयारी करण्यासाठी आता फारसा वेळ नाही. मागच्या वर्षी आपल्याकडे वेळ होता. त्यामुळे मैदान साफ करता आले. या वर्षी मात्र फारसा वेळ नसल्याने जो छोटा-मोठा दसरा मेळावा होईल त्याची तयारी केली जाईल, असेही यावेळी जरांगे यांनी सांगितले. परंपरेनुसार आपण दसरा मेळावा 100 टक्के करायचा. तिथूनच सरकारला तुम्ही काय दिलं नाही आणि आम्ही तुमच्याकडून कसे घेतो हे सांगू, असा इशाराही जरांगे यांनी सरकारला यावेळी दिला.

**सरकारी खोडा**

## मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करण्याचा आयुक्तांचा पवित्रा

# विकासकामांना सरकारी कार्यालयांचाच खोडा

## विकासकामांबाबत हट्टी भूमिका

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात विकासाची कामे करताना राज्य सरकारचे विविध विभाग आडमुठी भूमिका घेतात. त्यामुळे कामे करताना अडचणी येतात. महापालिकेच्या विकासकामांबाबत हट्टी भूमिका घेणाऱ्या विभागांची यादी तयार करण्याचे काम सुरू असून, या विभागांची तक्रार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सोमवारी सांगितले.**



शहरातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यासाठी, तसेच गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विकासकामांना गती मिळावी, यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी 'वॉर रूम'ची स्थापना केली आहे. या माध्यमातून प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी आयुक्त राम यांनी संबंधित विभागांच्या प्रमुखांची आणि 'वॉररूम'ची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांची महापालिकेत बैठक घेतली.'अनेक विकासकामे करण्यासाठी राज्य सरकारशी संबंधित विभागांच्या मान्यतेची आवश्यकता भासते; महापालिकेच्या वतीने या विभागांकडे वारंवार पाठपुरावा करूनही महापालिकेला सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही, काम करण्याची मान्यता देण्याच्या बदल्यात पालिकेकडून शुल्क आकारले जाते, वेळेत परवानगी दिली जात नाही. परिणामी, कामे रखडून खर्चात वाढ होते,' अशी चर्चा या बैठकीत झाली.बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आयुक्त राम म्हणाले, 'राज्य सरकारच्या विविध विभागांकडून अडवणूक केली जात असल्याने विकासकामांचा वेग कमी झाला आहे. महापालिकेला समान पाणी पुरवठा योजनेंतर्गत शहरात जलवाहिनी टाकण्याचे काम करायचे आहे. मात्र, जलसंपदा विभाग त्यामध्ये खोडा घालतो. महापालिकेने शुल्क म्हणून १० कोटी रुपये द्यावेत, त्यानंतर जलवाहिनी टाकावी, अशी भूमिका जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेतली आहे.''महापालिकेचे काम हे सर्वसामान्य नागरिकांसाठी केले जाते. त्यामुळे अशा पद्धतीने अडवणूक करणे योग्य नाही. 'टास्क फोर्स'मधील कामांचा आढावा घेताना अनेक प्रकल्पांबाबत अशी स्थिती असल्याचे समोर आले. ठरावीक शुल्क भरल्यानंतरच कामासाठी परवानगी दिली जाईल, अशी भूमिका घेतली जाते,' असे राम यांनी स्पष्ट केले. 'सरकारी विभागांनी घेतलेल्या आठमुठ्या भूमिकेमुळे शहरातील अनेक विकास प्रकल्पांची कामे खोळंबली आहेत. पाटबंधारे विभाग, पोलीस यांच्यासह संरक्षण विभागाच्या कार्यालयांचा यामध्ये समावेश आहे. विकासकामांना अडथळा निर्माण करणाऱ्या विभागांची सविस्तर यादी तयार करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. ही यादी तयार झाली, की संबंधित विभागांची तक्रार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करून त्यांना वस्तुस्थितीची माहिती दिली जाणार आहे.' असेही राम म्हणाले.नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविणे ही महापालिकेची प्राथमिक आणि महत्त्वाची भूमिका असते. मात्र, विकासकामे करताना अनेकदा शासनाच्या विविध विभागांकडूनच अडवणूक केली जाते. याबाबत शासनाकडे तक्रार करणार आहे. शहरातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यासाठी, तसेच गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विकासकामांना गती मिळावी, यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी 'वॉर रूम'ची स्थापना केली आहे. या माध्यमातून प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी आयुक्त राम यांनी संबंधित विभागांच्या प्रमुखांची आणि 'वॉररूम'ची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांची महापालिकेत बैठक घेतली.'अनेक विकासकामे करण्यासाठी राज्य सरकारशी संबंधित विभागांच्या मान्यतेची आवश्यकता भासते; महापालिकेच्या वतीने या विभागांकडे वारंवार पाठपुरावा करूनही महापालिकेला सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही, काम करण्याची मान्यता देण्याच्या बदल्यात पालिकेकडून शुल्क आकारले जाते, वेळेत परवानगी दिली जात नाही. परिणामी, कामे रखडून खर्चात वाढ होते.

### शहरात जलवाहिनी टाकण्याचे काम

बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आयुक्त राम म्हणाले, 'राज्य सरकारच्या विविध विभागांकडून अडवणूक केली जात असल्याने विकासकामांचा वेग कमी झाला आहे. महापालिकेला समान पाणी पुरवठा योजनेंतर्गत शहरात जलवाहिनी टाकण्याचे काम करायचे आहे. मात्र, जलसंपदा विभाग त्यामध्ये खोडा घालतो. महापालिकेने शुल्क म्हणून १० कोटी रुपये द्यावेत, त्यानंतर जलवाहिनी टाकावी, अशी भूमिका जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेतली .

# आयुष हत्याप्रकरणी आरोपींना कोठडी

## एकूण 11 गोळ्या झाडल्या गेल्याची पोलिसांची न्यायालयात माहिती

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी प्रतिस्पर्धी टोळीतील आरोपी गणेश कोमकर याचा मुलगा आयुष याच्यावर आंदेकर टोळीतील सराइतांनी ११ गोळ्या झाडल्याचे उघडकीस आले. त्यापैकी नऊ गोळ्या आयुषच्या शरीरात शिरल्याची माहिती पोलिसांनी न्यायालयात दिली. या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी प्राजक्ता आपटे यांनी १२ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.**



लहान भावाला शिकवणीवरून घरी घेऊन आलेल्या आयुषवर नाना पेठेतील लक्ष्मी कॉम्प्लेक्समधील तळमजल्यावर दबा धरून बसलेल्या आंदेकर टोळीतील सराइत यश पाटील आणि अमन पठाण यांनी पिस्तुलातून गोळीबार केला.

या प्रकरणी यश सिद्धेश्वर पाटील (वय १९) आणि अमित प्रकाश पाटोळे (वय १९, रा. नाना पेठ) यांना अटक करण्यात आली. याबाबत आयुषची आई कल्याणी गणेश कोमकर (वय ३७, रा. लक्ष्मी कॉम्प्लेक्स, हमाल तालमीजवळ, नाना पेठ) यांनी समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

याप्रकरणी आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर याच्यासह ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पसार आरोपी यश पाटील, अमित पाटोळे यांना अटक करण्यात आली. दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले सुजल मिरगू तेथे होते. आरोपींना पिस्तूल कोणी दिले, या दृष्टीने तपास करायचा असल्याने आरोपींना पोलीस कोठडी द्यावी,' अशी विनंती पोलिसांनी न्यायालयाकडे केली. न्यायालयाने पाटील आणि पाटोळे यांना पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

### पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार

आयुषवर आरोपींनी अकरा गोळ्या झाडल्या. हल्ला झाला तेव्हा आयुषने जर्कीन परिधान केले होते. गोळ्या शिरल्याने जर्किनची चाळण झाली होती. गोळीबार करताना चौघे आरोपी होते. दोघे जण लक्ष्मी कॉम्प्लेक्स इमारतीसमोर दुचाकीवर थांबले होते. गोळीबार केल्यानंतर आरोपी 'इथे फक्त बंडू आंदेकर आणि कृष्णा आंदेकरच,' असे ओरडले.

पालिका निवडणूक : १२८ जागांपैकी ९३ जागा आरक्षित; ऑक्टोबरमध्ये सोडत

# युती की आघाडी; उमेदवारांचे तळ्यात मळ्यात!

## प्रभाग आरक्षण अन् वरिष्ठांच्या निर्णयावर इच्छुकांचे भवितव्य; दिवाळीनंतर निवडणूक जाहीर होण्याची शक्यता

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीची प्रारूप प्रभागरचना प्रसिद्ध झाली आहे. महापालिका निवडणूक लोकसभा व विधानसभा निवडणुकीप्रमाणे महायुती आणि महाविकास आघाडी अशी होणार की स्वतंत्रपणे लढली जाणार, याची उत्सुकता निर्माण झाली आहे. तर, आरक्षण सोडतीत प्रभाग सुटणार की अडचण होणार, यावरून अनेकांचे भवितव्य टांगणीला लागले आहे.**



चारसदस्यीय ३२ प्रभागाची प्रारूप रचना २२ ऑगस्टला प्रसिद्ध झाली आहे. निवडणुकीचा बार दिवाळीनंतर उडणार आहे. निवडणूक युती की आघाडी अशी होणार जाणार, याबाबत कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. लोकसभा व विधानसभेप्रमाणे युती व आघाडीत निवडणूक होईल का याबाबत पक्षश्रेष्ठीकडे सातत्याने विचारणा केली जात आहे. महापालिकेत भाजपचे सर्वाधिक ७७ माजी नगरसेवक होते. तर एकत्र राष्ट्रवादी मध्ये काँग्रसचे ३९ माजी नगरसेवक होत. एकत्रित शिवसेनेची 9 माजी नगरसेवक इतकी ताकद होती. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचे दोन स्वतंत्र पक्ष होऊन माजी नगरसेवक विभागले गेले.

भाजपाच्या काही माजी नगरसेवकांनी पक्षाला राम राम केला आणि दुसऱ्या पक्षाची वाट धरली आहे. राज्यातील भाजपासह शिवसेना व राष्ट्रवादी महायुतीची सत्ता असल्याने माजी नगरसेवकांसह इच्छुकांची भाजपकडे जास्त ओढ असल्याचा दावा करण्यात येत आहे. शहरात भाजपकडे सर्वाधिक माजी नगरसेवक तसेच, इच्छुक आहेत, असे सांगितले जात आहे. ही बाब लक्षात येऊन, भाजपाच्या स्थानिक नेत्यांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याची तयारी केली आहे. त्याबाबत वरिष्ठांनाही सांगण्यात आले आहे. स्थानिक पदाधिकायांच्या निर्णयास पक्षश्रेष्ठींनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगण्यात येत आहे.

महापालिकेतअजित पवारांची राष्ट्रवादी हा दुसरा मोठा पक्ष आहे. पक्षाकडे माजी नगरसेवक तसेच इच्छुकांची संख्या अधिक असल्याचा विश्वास स्थानिक पदाधिकारी दाखवत आहेत. राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांकडूनही याबाबत वारंवार दुजोरा दिला जात आहे. पक्षाचे अनेक मास लीडर नेते शहराचे दौरे करत आहेत त्यामुळे राष्ट्रवादीतही स्वभावाचा नारा वारंवार दिला जात आहे. पुण्यातील बैठकीतही त्यांनी तसे स्पष्ट संकेत दिले. विकास आराखडाच्या विरोधात राष्ट्रवादीकडून महापालिकेवर महामोर्चा काढण्यात होता. लोकहितासाठी पक्षाने आक्रमक भूमिका घेतल्याचे सांगितले जात आहे. भाजपच्या कोट्यातील अधिकाधिक जागा पदरी पाडून घेण्यासाठी आरपीआयचे स्थानिक पदाधिकारी आक्रमक भूमिकेत असल्याचे दिसत आहे. महापालिकेच्या विरोधात तसेच अतिक्रमणविरोधी कारवाईच्या विरोधात पक्षाने आंदोलन करीत आक्रमकता स्पष्ट केली आहे.

### नजरा आरक्षणाकडे

महापालिकेत एकूण १२८ जागा आहेत. त्यापैकी ९३ जागा आरक्षित असणार आहेत. प्रभाग रचनेवर सुनावणी होवून प्रभाग रचना अंतिम झाल्यानंतर ऑक्टोबर २०२५ ला आरक्षण सोडत काढली जाणार आहे. एससी, एसटी, ओबीसी व महिला आरक्षणात प्रभाग सुटतो की अडकतो, याकडे अनेकांच्या नजरा लागल्या आहेत, प्रभागात आरक्षण पडल्यास आजूबाजूच्या प्रभागातही चाचणी करण्याची अनेकांनी मनाची तयारी करून ठेवली आहे. तयारी केलेल्या प्रभागातच महिला आरक्षण पडल्यास पत्नी, आई किंवा सून यांना उमेदवारी देण्याबाबत अनेकांनी तयारी केली आहे. सामाजिक, सांस्कृतिक व इतर कार्यक्रमांना कुटुंबातील महिला सदस्याची आवर्जुन उपस्थिती लावली जात आहे. तसेच, फ्लेक्स, होर्डिंग, सोशल मीडियावर इच्छुकांसोबत महिला सदस्यांचे छायाचित्र ठळकपणे प्रसिद्ध केले जात आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये डीजेचा अतिरेक!

## डीजेचा दणदणाट 110 डेसिबल; मिरवणुकांमध्ये पोलीसही हतबल

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गणेश विसर्जन मिरवणुकीत ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी करण्यात आलेल्या आवाहनाला यंदाही पायदळी तुडवण्यात आले. न्यायालयाचे आदेश आणि पोलिसांच्या परिपत्रकानुसार डीजे वाजविणे आणि लेझर लाइट वापरास मनाई आहे. तरीही सर्वत्र डीजेच्या आवाजासह लेझर किरणांचा अतिरेक दिसून आला. यामुळे ध्वनिप्रदूषणाचे प्रमाण सरासरी दोन ते पाच डेसिबलने वाढून सुमारे १०९.२ पर्यंत नोंदवले गेले.**



गणेशोत्सव शांततेत आणि पारंपरिक ढोल-ताशा वादनाने पार पाडावा असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते प्रशासन आणि वारंवार केले. काहींनी तर पत्रव्यवहार करून डीजे व लेझर टाळण्याची मागणी केली सुरुवातीला मंडळांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे दाखवले मात्र प्रत्यक्षात सर्व कागदोपत्री होते. धांगडधिंगा, लेझरचा अतिरेक, डीजेचा दणदणाट दिसून आला.

पोलिसांसमोरच डीजेच्या आवाजावर अंगविक्षेप सुरू होते. मिरवणूक जाणाऱ्या रस्त्यांलगतच्या नागरिकांनी दारे, खिडक्या लावूनही घरातल्या वस्तू डीजेच्या कंपन्यामुळे थरथरत होत्या. याचा रस्त्यालगतच्या रुग्णालयात तसेच ज्येष्ठ नागरिकांना या डीजेच्या आवाजाचा त्रास सहन करावा लागला. गेल्या वर्षी शहरात सरासरी 87.5 डेसिबिल ध्वनी मर्यादा पोहोचली होती. यावर्षी त्यात वाढ झाली असून 110 डेसिबल ध्वनी प्रदूषण नोंदवण्यात आले आहे.

गेल्या दहा दिवसांमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरीमध्ये 109, चिंचवड मध्ये 97.8, भोसरी मध्ये 88.8 इतके ध्वनी प्रदूषण नोंदवले गेले आहेत. गणेश आगमन मिरवणुकांवेळी काही मंडळांनी डीजेचा वापर केला. काहींनी पारंपारिक वाद्य वाजवत सामाजिक संदेश देखील दिला. लेझरचा वापर करण्यास मज्जाव करण्यात आला असताना देखील अनेक ठिकाणी लेझरचा वारेमाप वापर होताना दिसून आला.

त्यामुळे पोलिसांच्या कारवाईचा केवळ फार्स असल्याचे दिसून आले. डीजे मुक्त शहर कागदावरच राहिल्याचे यंदाही दिसले.



## भूमिका

**यंदाचीही गांधी जयंती नेहमीच्याच उत्साहात साजरी होईल. यंदा तर १५५ वी जयंती, त्यामुळे उत्साह अधिकसुद्धा असू शकतो. चित्रकलेच्या प्रांतात गांधीजींची आठवण होण्यासाठी गांधी जयंतीच उजाडावी लागते, असं काही नाही. गांधीजींची स्मरणीय ठरणारी चित्रं नंदलाल बोस ते अतुल दोडिया अशा अनेक भारतीय चित्रकारांनी केली आहेत.**

# बंदुकीच्या अल्याडपल्याड...

जगभरात गांधीजींचा अहिंसक सत्याग्रहाचा विचार पोहोचलेला आहेच (अमेरिकेत मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर, दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेला यांनी आपापल्या देश-काळाच्या संदर्भात तो विचार आचरणातही आणल्याचा इतिहास आहे); पण समजा मरीना अब्राहमोविच हिच्यासारख्या सर्बियन 'परफॉर्मन्स आर्टिस्ट'ला गांधीजी समजा माहीतच नसले, तरी १९७४ सालच्या तिच्या 'ऱ्हिदम झीरो' सारख्या कलाकृतीतून गांधीजींच्या कणखर अहिंसक प्रतिकाराचा संदेशच उजळलेला आहे'परफॉर्मन्स आर्ट' ही दृश्यकलावंतानं प्रेक्षकांसमोर जगलेल्या क्षणांमधून साध्य होते आणि कलावंतानं केवळ या क्षणांची मध्यवर्ती कल्पना ठरवलेली असते... पुढं जे काही घडतं ते प्रत्यक्ष घडत जातं, हे ज्यांना माहीत आहे त्यांना मरीना अब्राहमोविचसुद्धा माहीत असेलच. पन्नास वर्षांपूर्वी त्या 'ऱ्हिदम झीरो' या परफॉर्मन्स



कलाकृतीसाठी ती सहा तास प्रेक्षकांसमोर स्तब्ध उभी राहिली (तेव्हा ती युगोस्लाव्हियातली २८ वर्षांची तरुणी होती) आणि शेजारच्या टेबलावर तिनं ७२ विविध प्रकारच्या वस्तू ठेवल्या. लिपस्टिक, परफ्यूम, ब्रेड, वर्तमानपत्र... चाकूचं पातं, कात्री... फुलांचा गुच्छ, आरसा, काडेपेटी, मेणबत्ती, बॅण्डेज... अशी त्या वस्तूंची यादी आता 'टेट गॅलरी'च्या संकेतस्थळावर सापडते. 'या वस्तूंपैकी कोणतीही एखादी वस्तू प्रेक्षकांपैकी एकेकानं येऊन उचलावी, मरीनावर त्या वस्तूचा उपयोग करावा' अशी या 'ऱ्हिदम झीरो'ची मध्यवर्ती कल्पना! त्यातून मरीनाच्या शरीरावर जखमा झाल्या, तिचे कपडे फाडले गेले... पण न डगमगता तिनं हे सहन केलं. याचं भारतीय विश्लेषण असं होऊ शकतं की, महात्मा गांधींच्या अहिंसक प्रतिकाराची ताकद, स्वामी विवेकानंदांच्या कर्मयोगातल्या 'लोखंडी गोळा आदळला तरी अविचल राहणाऱ्या भिंती'ची ताकद मरीनानं दाखवली.ग्वाटेमाला या देशातली रेजिना होजे गालिन्दो हीदेखील परफॉर्मन्स आर्टिस्ट. 'व्यवस्थात्मक अन्याय आणि मानवी हक्कांचं उल्लंघन' हे या रेजिनाच्या परफॉर्मन्समधून वारंवार येणारे विषय. ती दिसते लहानखुरी, पण गेली सुमारे ३० वर्षं तिचं काम सुरू आहे (तिचा जन्म २०७४ सालचा, हा अब्राहमोविच यांच्या संदर्भात पाहिल्यास एक योगायोगच). या रेजिना गालिन्दो यांना २०१७ च्या 'डॉक्युमेण्टा' महाप्रदर्शनात त्यांची कलाकृती सादर करण्याचं निमंत्रण आलं, ते त्यांनी स्वीकारलंही. पण जर्मनीच्या कासेल शहरात दर पाच वर्षांनी भरणारं (आणि केवळ त्याच खेपेपुरतं, ग्रीसच्या अथेन्स या राजधानीतही तितक्याच प्रमाणावर भरलेलं) हे 'डॉक्युमेण्टा' महाप्रदर्शन १०० दिवसांचं असतं. तेवढे दिवस कसा काय करणार परफॉर्मन्स? मग रेजिना यांनी पाच-सहाच दिवस आणि तीन-तीन तासांच्या वेळा ठरवल्या आणि त्यानुसार त्यांनी स्वत:, सदेह सहभाग या 'परफॉर्मन्स'मध्ये नोंदवला... पण या परफॉर्मन्स कलाकृतीचं नेपथ्य त्यांनी असं केलं होतं की, पाहणारे आणि पाहिले जाणारे हे दोघेही सहभागी असतील. एका मध्यवर्ती कल्पनेआधारे जगलेल्या क्षणांमधून जे काही घडलं, त्याचा अनुभव त्या दोन्ही प्रकारच्या सहभागींना मिळेल. वरची वाक्यं चटकन समजणार नाहीत कदाचित; पण त्या कलाकृतीच्या नेपथ्याचं वर्णन समजेल. शिवाय इथं छायाचित्रंही आहेतच. एक चौकोनी खोली- पण तिच्या चारही कोपऱ्यांत काचा- बाहेरून अपारदर्शक आणि आतून काळ्या- या प्रत्येक काचेमधून बंदुकीची नळी रोखली गेली आहे... ही आहे 'जी ३६' या जर्मन रायफलीची नळी. या बंदुकीचा खटका खोलीबाहेरच्या प्रेक्षकाच्या हाती आहे. खोलीत कोण उभं आहे, त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरले भाव बंदुकीच्या नळीसमोर आल्यावर कसे होताहेत, हे बाहेरून पाहता येतंय... पण ते पाहण्यासाठी रायफलच वापरावी लागते आहे. रायफलीला 'लक्ष्य'केंद्रित करण्यासाठी जो डोळा (स्नायपर) असतो, त्यावर लक्ष केंद्रित करून मगच आतलं पाहता येईल, अशी व्यवस्था रेजिना यांनी केली होती.

## संपादकीय »

### शिक्षणच 'ऑप्शन'ला!

***राज्याच्या पाच विद्यापीठांत प्राध्यापकांच्या मंजूर पदांपैकी ६० पदे रिकामी, महाविद्यालयांत १२ हजार सहायक प्राध्यापकांची वानवा***

जेव्हा देशातील विद्यापीठे, महाविद्यालये यांत प्राध्यापकांची हजारो पदे न भरता रिक्त ठेवली जातात, जेव्हा एखाद्या रोजगार हमी योजनेवरील अकुशल कामगारांप्रमाणे 'तासिकां'वर प्राध्यापक वेठबिगारी करतात तेव्हा त्या देशातील शिक्षणाची अवस्था आणि म्हणून भविष्य काय असेल? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो जेव्हा हा देश महासत्ता होण्याचे स्वप्न पाहातो आणि अशा गुणवंत शिक्षक आणि गुण-केंद्रित शिक्षणाशिवाय ते स्वप्न प्रत्यक्षात येईल असे मानू लागतो. एके काळी गुणवान शिक्षणासाठी ओळखल्या जाणाऱ्या भारताचे हे वास्तव. नुकत्याच झालेल्या शिक्षक दिनानिमित्त ते लक्षात घेणे आवश्यक ठरते. कोणत्याही राष्ट्राच्या उभारणीत महत्त्वाचा वाटा असतो तो शिक्षण या संकल्पनेचा. तितकी त्या देशाच्या प्रगतीची संधी अधिक. अमेरिकेसारखा देश आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा नऊ-दहा टक्के इतका प्रचंड वाटा शिक्षणावर खर्च करतो.

**राज्यातील प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सामाजिकछत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ही संस्था शिक्षण, मार्गदर्शन, कौशल्यविकास, रोजगार, उद्योजकता, संशोधन आणि सांस्कृतिक वारसा संवर्धन या क्षेत्रांत सहा उपक्रम राबवत आहे.**

# मराठा समाजाच्या स्वप्नांना 'सारथी'चे पंख

२०२१ ते २०२५ या काळात आठ लाख ३८ हजार ४७७ लाभार्थींनी या संस्थेच्या उपक्रमांत सहभाग घेतला. अनेक विद्यार्थी येथे मार्गदर्शन घेऊन विविध क्षेत्रांत यश संपादन करत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि मार्गदर्शनावर आतापर्यंत ६४७ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. संस्थेतील विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये निवड होण्याचे नवे उच्चांक निर्माण करत आहेत.सारथीमार्फत विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण दिले जाते, मुलाखतीची तयारी, मार्गदर्शन यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. संस्थेचे ११२ विद्यार्थी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षा देऊन आज शासकीय सेवेत रुजू झाले आहेत. राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांत १,०४८ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास व संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम तालुका



स्तरावर राबवण्यात येतो. ९७ हजार २८६ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. ३४ हजार ३०४ लाभार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. सात हजार ३६५ लाभार्थ्यांना नोकरी मिळाली आहे. महाविद्यालयांतील १७ हजार २५१ लाभार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी इंडो जर्मन टूल रूम कौशल्य प्रशिक्षण' उपक्रमाअंतर्गत छत्रपती संभाजी नगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर येथे आयटीआय, पदविका व अभियांत्रिकी पदवी प्राप्त एक हजार १२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यापैकी ६५७ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले असून ३१४ विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत विद्यार्थ्यां'पैकी परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत २०२३-२४ मध्ये एकूण ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यांना आजवर एकूण सहा कोटी रुपयांच्या शिष्यवृत्ती रकमेचा लाभ देण्यात आला आहे. २०२४-२५ मध्ये या योजनेअंतर्गत एकूण ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या योजनेअंतर्गत मार्च २०२५ अखेर सहा कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.वसंतदादा साखर संस्था, पुणे येथील इंडस्ट्रियल फर्मिनेशन अँड अल्कोहोल टेक्नॉलॉजी (आयएफएटी) आणि वाइन ब्रुविंग अँड अल्कोहोल टेक्नॉलॉजी (डब्ल्यूबीएटी) विद्यार्थ्यांकरिता 'उदयोन्मुख कृषी औद्योगिक क्षेत्रातील शैक्षणिक संधी शैक्षणिक शुल्क प्रतिकृती योजना' असून या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना १०० टक्के शैक्षणिक शुल्क रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

एक टीम म्हणून काम

आम्हाला विकसित भारताचं स्वप्न साकार करायचं आहे

# भाजपाने तुम्हाला बाजूला केलंय का?

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जून २०२२ मध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप झाला. एकनाथ शिंदे हे शिवसेनेतील ४० आमदारांना आपल्याबरोबर घेऊन महाराष्ट्र सोडून थेट गुवाहाटीला निघून गेले. त्यांनी या ४० आमदारांसह वेगळा गट स्थापन केला आणि आम्हीच खरी शिवसेना असल्याचा दावा केला. त्यावर निवडणूक आयोगाने देखील शिक्कामोर्तब केलं. त्यांच्या या भूमिकेमुळे राज्यातील तत्कालीन उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीचं सरकार कोसळलं.**

## विकास हा आमचा प्रमुख अजेंडा




ठाकरेंचं सरकार कोसळल्यानंतर शिंदे यांनी भारतीय जनता पार्टीच्या पाठिंब्यावर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन केलं. शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर पुढील अडीच वर्षे त्यांनी राज्याचं नेतृत्व केलं.दरम्यान, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने २३८ जागा जिंकत राज्यात सत्ता मिळवली. मात्र, यावेळी भाजपाने मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड केली. तर, शिंदे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर एकनाथ शिंदे हे पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपद मिळावं यासाठी प्रयत्न करत होते. मात्र, भाजपाने तब्बल १३२ जागा जिंकल्याने भाजपाने मुख्यमंत्रिपद सोडलं नाही. शिंदे मुख्यमंत्री असताना ते महायुतीचे प्रमुख नेते होते. भाजपाचा त्यांना खंबीर पाठिंबा होता. मात्र, आता फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून भाजपाने शिंदे यांना बाजूला सारल्याची चर्चा आहे. यावर एकनाथ शिंदे यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे.एकनाथ शिंदे दी इंडियन एक्सप्रेसच्या आयडिया एक्सचेंज या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी मराठा आंदोलन, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि राज्यातील सध्याची स्थिती यावर भाष्य केलं.फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून भाजपाने तुम्हाला बाजूला केलंय का? असा प्रश्न विचारल्यावर एकनाथ शिंदे म्हणाले, “नाही! मला तसं वाटत नाही. कारण मी मुख्यमंत्री होतो तेव्हा दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मी असे मिळून आम्ही एक टीम म्हणून काम करत होतो. आता देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत. आता ते आणि आम्ही दोघे (दोन्ही उपमुख्यमंत्री) अशी आमची टीम आहे.एकनाथ शिंदे म्हणाले, “विकास हा आमचा प्रमुख अजेंडा

### भारताचं स्वप्न साकार करायचं

यावर एकनाथ शिंदे यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे.एकनाथ शिंदे दी इंडियन एक्सप्रेसच्या आयडिया एक्सचेंज या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी मराठा आंदोलन, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि राज्यातील सध्याची स्थिती यावर भाष्य केलं.फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून भाजपाने तुम्हाला बाजूला केलंय का? असा प्रश्न विचारल्यावर एकनाथ शिंदे म्हणाले, “नाही! मला तसं वाटत नाही.

आहे, आम्हाला महाराष्ट्राला पुढे न्यायचं आहे. यात आमचा कुठलाही वैयक्तिक अजेंडा नाही. सध्या महाराष्ट्रात बरीच गुंतवणूक येत आहे. पंतप्रधान मोदी यांचं जे २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याचं स्वप्न आहे, त्यासाठी आम्ही काम करत आहोत. या विकासाचे आम्ही तीन टप्पे तयार केले आहेत. २०२९, २०३५ आणि २०४७ अशा टप्प्यांत आम्ही काम करणार आहोत.”ठाकरेंचं सरकार कोसळल्यानंतर शिंदे यांनी भारतीय जनता पार्टीच्या पाठिंब्यावर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन केलं. शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर पुढील अडीच वर्षे त्यांनी राज्याचं नेतृत्व केलं.दरम्यान, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने २३८ जागा जिंकत राज्यात सत्ता मिळवली. मात्र, यावेळी भाजपाने मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड केली. तर, शिंदे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर एकनाथ शिंदे हे पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपद मिळावं यासाठी प्रयत्न करत होते. मात्र, भाजपाने तब्बल १३२ जागा जिंकल्याने भाजपाने मुख्यमंत्रिपद सोडलं नाही. शिंदे मुख्यमंत्री असताना ते महायुतीचे प्रमुख नेते होते. भाजपाचा त्यांना खंबीर पाठिंबा होता. मात्र, आता फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून भाजपाने शिंदे यांना बाजूला सारल्याची चर्चा आहे.

# आरक्षणाबाबतचा निर्णय नवा नाही

## प्रक्रिया सुलभ केली; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दावा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय २०१२ मध्ये घेण्यात आलेला आहे. नवीन काही आम्ही केलेले नाही. फक्त प्रक्रिया सोपी केली असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी सांगितले. छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार बैठकीत ते बोलत होते. या निर्णयामुळे ओबीसी समाजाचे काही काढून घेतले नाही. हा निर्णय घेण्याआगोदर मंत्री छगन भुजबळ यांच्याशीही चर्चा झाली होती, असा दावा शिंदे यांनी केला.**



मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेल्या निर्णयामुळे ओबीसींचे नुकसान होणार नाही, असे सांगत एकनाथ शिंदे म्हणाले की, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एकत्रित चर्चा करुन हा निर्णय घेतला आहे. भुजबळ यांनीही या शासन निर्णयाची कायदेशीर बाजू तपासून पाहू असे म्हटले होते. पण घेतलेल्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजाचे नुकसान होत नाही, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.त्यामुळे आम्ही काही नवा निर्णय घेतला नाही तर प्रमाणपत्र मिळवून देण्याची पद्धत सोपी केली आहे. या पूर्वी मराठवाड्यात कधी कुणबी प्रमाणपत्र मिळत होते का, ज्यांच्या नोंदी मिळाल्या त्यांना प्रमाणपत्र दिले. कोणत्याही समाजाचा अधिकार कमी होता कामा नये, तसा तो केलेला नाही, असेही ते म्हणाले.पत्रकार परिषदेपूर्वी कार्यकर्त्यांशी बोलताना त्यांनी महायुतीबाबतचे निर्णय घेण्यास आम्ही सक्षम आहोत. त्याचे निर्णय योग्यवेळी होतील. तुम्ही डोकं लावू नका, असे सांगत शिंदे यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये आपल्या निर्णयावर जनतेने शिक्कामोर्तब केले आहे.

### तुमच्या डोक्यावर मिऱ्या वाटतील.

निवडणुका जिंकण्यासाठी मतदार यादीवर कार्यकर्त्यांनी काम करावे, असेही ते म्हणाले.ज्यांनी संघटना काँग्रेसच्या दावणीला बांधली आणि धनुष्यबाण गहाण टाकला अशांबरोबर राहणे शक्य नव्हते. म्हणून तेव्हा घेतलेल्या निर्णयाचा अभिमान असल्याचेही जर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जागा कमी आल्या तर विरोधक तुमच्या डोक्यावर मिऱ्या वाटतील.

## व्हिडीओ व्हायरल

## डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबरचा एक व्हिडीओ सध्या व्हायरल

# ट्रम्प यांच्या प्रश्नावर झकरबर्ग भांबावले

## 'ऑफ द रेकॉर्ड' संवादही रेकॉर्ड



| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या आठवड्यातच अमेरिकेत व्यवसाय करणाऱ्या टेक दिग्गजांची व्हाईट हाऊस येथे डिनर पार्टी आयोजित केली होती. या पार्टीसाठी जवळपास सर्वच मोठ्या कंपन्यांचे प्रमुख उपस्थित होते. त्यात बिल गेट्स, टिम कूक, मार्क झकरबर्ग आणि सुंदर पिचई यांचाही समावेश होता. विशेष म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांनी या सर्वांमध्ये फेसबुकचे प्रमुख मार्क झकरबर्ग यांना आपल्या बाजूला बसवून घेतलं. याचवेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी झकरबर्ग यांना विचारलेल्या एका प्रश्नावर झकरबर्ग यांनी दिलेल्या उत्तराप्रमाणेच नंतर त्यांनी त्याबाबत ट्रम्प यांच्याशी साधलेला 'ऑफ द रेकॉर्ड' संवादही रेकॉर्ड झाला!**

वॉशिंग्टनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या पार्टीसाठी आलेल्या मान्यवरांपैकी मार्क झकरबर्ग यांच्याशी ट्रम्प यांच्या झालेल्या संवादाचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. पार्टीमध्ये चर्चा करता करता अचानक डोनाल्ड ट्रम्प यांनी बाजूला बसलेल्या झकरबर्ग यांना एक प्रश्न केला. "पुढच्या काही वर्षांत तुम्ही अमेरिकेत किती भांडवल गुंतवणार आहात?" असं ट्रम्प यांनी विचारलं.डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून आलेल्या या प्रश्नामुळे झकरबर्ग जरा गडबडले. पण मग लागलीच स्वत:ला सावरून त्यांनी त्यावर ६०० बिलियन डॉलर्स इतका भलामोठा आकडा सांगितला. "ओह्ह... मला वाटतं २०२८ पर्यंत ही रक्कम जवळपास ६०० बिलियन डॉलर्स इतकी असू शकेल", असं झकरबर्ग म्हणाले. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच ॲपलनं अमेरिकेत तितक्याच गुंतवणुकीची घोषणा केली आहे. झकरबर्ग यांच्या या उत्तरावर ट्रम्प यांनी "ही बरीच मोठी रक्कम आहे", असा प्रतिसाद दिला. दरम्यान, या सगळ्या संवादानंतर मार्क झकरबर्ग हळूच डोनाल्ड ट्रम्प यांची माफी मागून म्हणाले, "सॉरी, मी तुमच्या प्रश्नासाठी तयार नव्हतो. मला नेमकं कळत नव्हतं की तुम्हाला नेमकी किती भांडवली गुंतवणूक अपेक्षित आहे", असं मार्क झकरबर्ग म्हणाले. त्यांच्या या उत्तरानंतर डोनाल्ड ट्रम्प या मोठ्या कंपन्यांशी करत असलेल्या पडद्यामागच्या चर्चांबाबत तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे. अलिकडेच ट्रम्प यांनी इतर देशांवर टॅरिफ लागू केल्यानंतर आता अमेरिकेत व्यवसाय करणाऱ्या या कंपन्या ट्रम्प यांच्या निशाण्यावर असल्याचं बोललं जात आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी पार्टीसाठी आलेल्या सर्व कंपन्यांच्या प्रमुखांना हाच प्रश्न विचारला. यावर प्रत्येकाने आपापल्या

### किती भांडवल गुंतवणार आहात?

पण मग लागलीच स्वत:ला सावरून त्यांनी त्यावर ६०० बिलियन डॉलर्स इतका भलामोठा आकडा सांगितला. "ओह्ह... मला वाटतं २०२८ पर्यंत ही रक्कम जवळपास ६०० बिलियन डॉलर्स इतकी असू शकेल", असं झकरबर्ग म्हणाले. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच ॲपलनं अमेरिकेत तितक्याच गुंतवणुकीची घोषणा केली आहे. झकरबर्ग यांच्या या उत्तरावर ट्रम्प यांनी "ही बरीच मोठी रक्कम आहे.

नियोजनानुसार गुंतवणुकीचे आकडे सांगितले. त्यानुसार, गुगलचे सीईओ सुंदर पिचई यांनी १०० बिलियन आणि पुढच्या दोन वर्षांत ही गुंतवणूक २५० बिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचा मानस बोलून दाखवला. मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नडेलला यांनी ८० बिलियन डॉलर्सचं नियोजन असल्याचं सांगितलं. ही सर्व गुंतवणूक प्रामुख्याने पुढील काळात अधिकाधिक विकसित होणाऱ्या AI सारख्या तंत्रज्ञानाच्या गरजा भागवण्यासाठी मोठमोठ्या डेटा सेंटर्समध्ये केली जाणार आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत सावलीप्रमाणे डोनाल्ड ट्रम्प यांच्या पाठिशी असणारे 'एक्स'चे सर्वेसर्वा एलॉन मस्क यांचे नंतर मात्र राष्ट्राध्यक्षांशी मतभेद झाले. हे मतभेद या दोघांनी उघडपणे जगासमोर बोलूनदेखील दाखवले. या पार्श्वभूमीवर मस्क यांनी ट्रम्प यांच्याशी असणारे आर्थिक वा राजकीय असे सर्वच संबंध जाहीररीत्या तोडले. त्यामुळे ट्रम्प यांनी वॉशिंग्टनमध्ये बोलावलेल्या टेक दिग्गजांच्या डिनर पार्टीसाठी एलॉन मस्क यांना मात्र निमंत्रण देण्यात आलेलं नसल्याचं बोललं जात आहे. या पार्टीसाठी एलॉन मस्क यांची अनुपस्थिती सगळ्यांच्याच चर्चेचा विषय ठरली होती!वॉशिंग्टनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या पार्टीसाठी आलेल्या मान्यवरांपैकी पार्टीमध्ये चर्चा करता करता अचानक डोनाल्ड ट्रम्प यांनी बाजूला बसलेल्या झकरबर्ग यांना एक प्रश्न केला. "पुढच्या काही वर्षांत तुम्ही अमेरिकेत किती भांडवल गुंतवणार आहात?

# नेपाळमध्ये सोशल मीडिया बंदीविरोधात आंदोलन

## आंदोलनात 14 जणांचा मृत्यू; मृतांचा आकडा वाढण्याची भीती




| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सोमवारी नेपाळची राजधानी काठमांडूमध्ये सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील बंदी आणि सरकारी भ्रष्टाचाराच्या विरोधात न्यू बानश्वरमध्ये रस्त्यावर उतरलेल्या २६ वर्षांखालील तरुणांच्या (जेन झेड) निदर्शनांमध्ये १४ जणांचा मृत्यू झाला आहे. द काठमांडू पोस्टने वृत्त दिले आहे की, निदर्शकांची पोलिसांशी चकमक झाल्याने आंदोलन हिंसक झाले आणि त्यामुळे काठमांडू जिल्हा प्रशासनाने न्यू बानश्वर परिसरात आणि आसपास कर्फ्यू लागू केला.**

काठमांडूच्या ज्या भागात निदर्शने तीव्र झाली आहेत आणि कर्फ्यू लागू करण्यात आला आहे, तिथे सैन्य तैनात करण्यात आले आहे. संसदेच्या इमारतीत घुसण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुण जमावाला पांगवण्यासाठी नेपाळी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या आणि रबर गोळ्या झाडल्या, असे अधिकारी आणि प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

आंदोलकांनी हिंसक वळण घेतल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आम्ही

### या चर्चेला इतके महत्त्व का?

गोळीबार अजूनही सुरू आहे आणि संसदेच्या आतूनही गोळीबाराचा आवाज येत आहे. रस्त्यावर उभ्या असलेल्या माझ्या मित्राच्या डोक्यात गोळी लागली. पोलिस गुडघ्यांपेक्षा वर लक्ष्य करून अंदाधुंद गोळीबार करत आहेत. त्यांना हे करण्याची परवानगी आहे का?"दरम्यान, हे आंदोलन आता तीव्र होत असताना, प्रमुख नेपाळी कलाकार आणि अभिनेत्यांनी याला आपला पाठिंबा व्यक्त केला आगे.

स्थानिक वेळेनुसार रात्री १० वाजेपर्यंत कर्फ्यू लागू केला आहे," असे वृत्तसंस्था रॉयटर्सने काठमांडू जिल्हा कार्यालयाचे प्रवक्ते मुक्तिराम रिजाल यांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे.गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिसांना पाण्याच्या तोफांचा, लाठ्यांचा आणि रबर गोळ्यांचा वापर करण्याचे आदेश देण्यात आले होते,काही वेळापूर्वी पोलिसांनी गोळीबार केला. यामध्ये मला दुखापत झाली नाही, पण माझ्या मागे उभ्या असलेल्या माझ्या एका मित्राला गोळी लागली. त्याच्या हातात गोळी लागली आहे.

# तू खरंच प्रेग्नंट आहेस का?

प्रिया बापटने काही दिवसांपूर्वीच इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर केला होता. यामध्ये प्रिया बेबी बंपवर हात ठेवून पोज देत असल्याचं पाहायला मिळालं होतं. या फोटोमुळे अभिनेत्री गरोदर असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. या फोटोच्या कमेंट्समध्ये देखील चाहत्यांनी तिला यासंदर्भातील प्रश्न विचारले होते. मात्र, या पोस्टच्या कॅप्शनमध्ये प्रियाने हे सिनेमातील फोटो असल्याचं स्पष्ट लिहिलं होतं. प्रिया बापटने नुकतंच इन्स्टाग्रामवर 'आस्क मी सेशन' घेतलं. यावेळी एका चाहतीने अभिनेत्रीला पुन्हा एकदा या फोटोवरून, "तू खरंच प्रेग्नंट आहेस की चित्रपटातील सीन आहे?" असा प्रश्न विचारला. हा प्रश्न वाचताच प्रिया बापट आणि निवेदिता सराफ या दोघीही खूप हसल्या. यानंतर "नाही! नाही!" असं उत्तर देत निवेदिता यांनी हा फोटो सिनेमादरम्यानचा आहे हे स्पष्ट केलं.प्रिया म्हणते, "मला निवेदिता ताईबरोबर पहिल्यांदा काम करण्याची संधी मिळाली आहे. मी तुम्हाला जशी छान गुडगुडीत गरोदर मुलगी दिसतेय...त्याचं कारण काय आहे? निवेदिता ताई तुम्हीच सांगा"यावर निवेदिता सराफ म्हणतात, "याचं कारण आता तुम्ही १२ सप्टेंबरला थिएटरमध्ये येऊन बघा. तुम्हाला कळेल की, प्रियाने खूप उत्तम काम केलं आहे. आताही तिचं काम पाहून तुम्हाला ती खरंच प्रेग्नंट आहे असं वाटतंय. त्यामुळे सिनेमा नक्की पाहा." पुढे प्रिया बापटने, "आमची छान केमेस्ट्री पाहायला १२ सप्टेंबरला नक्की चित्रपट पाहायला या" असं आवाहन चाहत्यांना केलं आहे.दरम्यान, प्रिया बापट व उमेश कामत हे दोघंही 'बिन लग्नाची गोष्ट' या सिनेमाच्या निमित्ताने तब्बल १२ वर्षांनंतर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र झळकणार आहे. या सिनेमात प्रिया-उमेशसह निवेदिता सराफ, गिरीश ओक, सुकन्या मोने आणि संजय मोने असे लोकप्रिय कलाकार एकत्र झळकणार आहेत.

# लग्नानंतर २ वर्षांनी मराठी अभिनेता होणार बाबा!

मराठी मालिकाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्याने नुकतीच सोशल मीडियावर आनंदाची बातमी शेअर केली आहे. हा अभिनेता लग्नानंतर दोन वर्षांनी बाबा होणार आहे. आजवर अनेक मालिकांमधून घराघरांत लोकप्रिय झालेल्या या अभिनेत्याचं नाव आहे आकाश नलावडे. सध्या तो 'स्टार प्रवाह'च्या 'साधी माणसं' या मालिकेत मुख्य भूमिका साकारत आहे. आकाश नलावडे ( ८ सप्टेंबर ) आज त्याचा वाढदिवस साजरा करत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने अभिनेत्याने सोशल मीडियावर एक खास गुडन्यूज शेअर केली आहे. तो लवकरच बाबा होणार आहे. आकाशची पत्नी रुचिकाने, बॅकग्राऊंडला प्रेग्नन्सी टेस्ट किटचा फोटो शेअर करत ही आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे. रुचिकाने यावर, "आमच्या घरी लवकरच बाळाचं आगमन होणार आहे. आम्ही प्रेग्नंट आहोत...देवा तुझे खूप खूप आभार" असं कॅप्शन दिलं आहे.रुचिका पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिते, "ही आनंदाची बातमी अनेक दिवस आम्ही गुपित ठेवली होती." यापुढे तिने "BABY ARRIVING", "लव्ह", "आमच्या घरचा नवीन सदस्य" असे हॅशटॅग्ज दिले आहेत. या पोस्टवर मराठी कलाकारांसह नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. साक्षी गांधी, दिगंबर नाईक यांनी कमेंट्समध्ये प्रतिक्रिया देत आकाश व रुचिका यांना शुभेच्छा दिल्या आहेत.आकाश नलावडेच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सांगायचं झालं तर, अभिनेत्याने २०२२ मध्ये रुचिका धुरीसह साखरपुडा केला होता. यानंतर १८ मार्च २०२३ रोजी आकाश आणि रुचिका यांनी लग्नगाठ बांधली.

# बिपाशा कमवते करोडो रुपये




आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि करणची गणना खूप श्रीमंत जोडप्यांमध्ये केली जाते. बिपाशाने चित्रपटांच्या दुनियेत खूप नाव कमावले आहे पण तुम्हाला माहिती आहे का या अभिनेत्रीची एकूण संपत्ती किती आहे? त्याच्या एकूण संपत्तीबद्दल जाणून घेऊया. बिपाशा बसू मुख्यतः तिच्या चित्रपट आणि जाहिरातींमधून मोठी कमाई करते. बिपाशा तिच्या प्रत्येक चित्रपटासाठी करोडो रुपये मानधन घेते. बिपाशा बसूची एकूण संपत्ती 15 मिलियन डॉलर म्हणजेच जवळपास 113 कोटी रुपये आहे. यासोबतच बिपाशा बसूचे मुंबई (वांद्रे) येथे 16 कोटी रुपयांचे आलिशान घर आहे, ज्यामध्ये ती तिच्या पतीसोबत आनंदी जीवन जगत आहे. जर तिच्या कार कलेक्शनबद्दल सांगायचं झालं तर, बिपाशाकडे ऑडी क्यू, 25 लाख किमतीच्या फोक्सवॅगन बीटल आणि 28 लाख किमतीच्या टोयोटा फॉर्च्युनर सारख्या आलिशान कार आहेत. आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि

# तुझं असं जाणं अपेक्षित नव्हतं

लोकप्रिय अभिनेत्री प्रिया मराठे हिच्या निधनाने मराठी इंडस्ट्रीतील अनेक कलाकारांनी हळहळ व्यक्त केली. प्रियाच्या निधनामुळे तिच्या जवळच्या कलाकार मित्र-मैत्रिणींना धक्का बसला. अनेकांनी सोशल मीडियावर तिच्याबद्दल पोस्ट करीत तिच्याबरोबरच्या आठवणी सांगितल्या. अशातच प्रियाची सहकलाकार व अभिनेत्री शिवानी सोनारने तिच्याबद्दल प्रतिक्रिया देत जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. शिवानी सोनार व प्रिया मराठे यांनी 'सोनी मराठी' वाहिनीवरील 'तू भेटशी नव्याने' या मालिकेत एकत्र काम केले होते. शिवानीने प्रियाबरोबरच्या आठवणी सांगताना भावुक होत प्रतिक्रिया दिली आहे. शिवानीने नुकतीच 'अल्ट्रा मराठी'ला मुलाखत दिली. त्यामध्ये ती म्हणाली, "खरं तर मी याबद्दल काहीही प्रतिक्रिया दिली नव्हती. मी तिचा कुठलाच फोटो किंवा स्टोरी शेअर केली नव्हती. कारण तेव्हा ती हिंमतच नाही झाली ते सगळं करायची. मला दोन दिवस लागले हे सगळं पचवायला. मला माहीत नाही आतापण मी काय आणि कशी बोलणार आहे."शिवानी पुढे म्हणाली, "आम्हाला थोडीफार कल्पना होती याबद्दल. कारण- अगदीच शेवटचा शो मी तिच्याबरोबर केला. फार वेळ आम्ही एकत्र नव्हतो. महिना-दीड महिनाच मी तिच्याबरोबर मेकअप रूम शेअर केली आहे; पण काही माणसं राहतात तुमच्यासोबत कायम. त्यामुळे मला असं वाटतं की, तीही राहील. मला यापूर्वी ही गोष्ट जाणवली नव्हती. पण, जेव्हा मराठी इंडस्ट्रीतील सगळे कलाकार तिच्याबद्दल भावना व्यक्त करीत होते तेव्हा तिच्याबरोबरच्या आठवणी ते सांगत होते. तेव्हा तिचं मोठेपण खऱ्या अर्थानं कळतं की, ती कोणी साधीसुधी व्यक्ती नव्हती. ती खरंच खूपच मोठी व्यक्ती होती."मालिकेदरम्यानच्या आठवणी सांगताना शिवानी म्हणाली, "मी, प्रिया व भक्ती रत्नपारखी आम्ही तिघी रूम शेअर करायचो. भक्तीताई आणि मी त्या दिवशी एकमेकींबरोबर बोललोच नाही. मी पुण्यात असल्यामुळे मला तिच्या अंत्यदर्शनाला जाता आलं नाही; पण भक्तीताई गेलेली. दुसऱ्या दिवशी माझं आणि भक्तीताईचं बोलणं झालं. एका बाजूला असं वाटतं की, ती सुटली त्या त्रासातून. कारण- तिला शेवटी शेवटी खूप जास्त त्रास होत होता. मग असं वाटायचं की, एवढ्या चांगल्या व्यक्तीला एवढ्या यातना नको. त्यामुळे आता असं वाटतं की, ती आता जिथे कुठे असेल तिथे ती १०० टक्के सुखी असेल यात वादच नाही. आपण म्हणतो ना की, देव कधी कधी खूप चांगल्या माणसांबरोबर खूप वाईट गोष्ट करतो. तसं काहीसं प्रियाताईबरोबर झालं."

# 'गोल्ड डिगर' म्हणणाऱ्यांना धनश्रीचं उत्तर



धनश्री वर्मा आणि क्रिकेटपटू युजवेंद्र चहल हे कायम चर्चेत राहणाऱ्या कपल्सपैकी एक कपल आहेत. घटस्फोटानंतरही दोघांबद्दलच्या चर्चा कमी झालेल्या नाहीत. त्यांच्या घटस्फोटाच्या कारणाबाबत लोक अनेक वेगवेगळे दावे करत आहेत. काही जण युजवेंद्र चहलने धनश्रीला फसवलं असं म्हणतात; तर काही जण धनश्रीला गोल्ड डिगर म्हणतात. युजवेंद्र चहलपासून विभक्त धनश्री वर्माला सोशल मीडियावर प्रचंड ट्रोलिंगला सामोरे जावं लागलं. अजूनही तिला ट्रोल केलं जातं, मात्र, आता तिने या टीकांकडे सकारात्मकपणे पाहायला शिकलं आहे. अशातच अलीकडेच तिने एका रिॲलिटी शोमध्ये तिला 'गोल्ड डिगर' म्हटलं जाण्याबद्दल खुमासदार प्रतिक्रिया दिली. धनश्री वर्मा अश्नीर ग्रोव्हरच्या 'राईज अँड फॉल' या रिॲलिटी शोमध्ये सहभागी झाली आहे. या शोचा एक प्रोमो भेटीला आला आहे. या प्रोमोमध्ये स्पर्धकांना जोड्यांमध्ये विभागून दोन सुटकेस बॅग निवडायला सांगितल्या आहेत. त्यापैकी एक 'गोल्डन बॅग' आहे, जी २ लाख रुपयांची आहे, तर दुसरी 'सिल्वर बॅग' असून त्यात १ लाख रुपये होते.या प्रोमोमध्ये धनश्री आणि अभिनेता अर्जुन बिजलानी यांची जोडी पाहायला मिळत आहे. यावेळी बॅगची निवड करताना अर्जुन म्हणतो, "मला डायमंड, सिल्वर काही जमत नाही. मला फक्त गोल्डच शोभतं." तेव्हा धनश्रीने हसत उत्तर देते की, "ही ओळ मी तर नक्कीच म्हणू शकत नाही. कारण जर मी हे म्हणाले, तर जे प्रेम मिळणार आहे, ते सुद्धा मिळणार नाही."दरम्यान, धनश्रीने केलेलं ही वक्तव्य 'गोल्ड डिगर' म्हणून केल्या जाणाऱ्या ट्रोलिंगवर आहे. या वक्तव्यातून तिने ट्रोलिंगबद्दल मिश्कील आणि चपखल टिप्पणी केली. दरम्यान, धनश्रीचा हा शो नुकताच ६ सप्टेंबरपासून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.फराह खानच्या एका व्लॉगमध्ये धनश्रीने सांगितलं की, ती अजूनही युजवेंद्र चहलबरोबर मेसेजद्वारे संपर्कात आहे. फराहने विचारलं की, ती पहिल्यांदाच एकटी राहत आहे का, त्यावर धनश्री म्हणाली, "आता सगळं स्थिर झालं आहे. मी अजूनही युजीबरोबर मेसेजवर संपर्कात असते. तो मला 'आई' म्हणायचा. तो खरंच गोड आहे."धनश्री आणि चहल यांची भेट कोविड लॉकडाऊनदरम्यान झाली होती आणि त्यांनी डिसेंबर २०२० मध्ये लग्न केलं. पण हळूहळू त्यांच्या वैवाहिक नात्यात दुरावा निर्माण झाला आणि २०२२ च्या मध्यात ते वेगळं राहायला लागले. शेवटी फेब्रुवारी २०२५ मध्ये त्यांनी परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज केला. मार्च २०२५ मध्ये त्यांना अधिकृत घटस्फोट मंजूर झाला.धनश्री वर्मा आणि क्रिकेटपटू युजवेंद्र चहल हे कायम चर्चेत राहणाऱ्या कपल्सपैकी एक कपल आहेत. घटस्फोटानंतरही दोघांबद्दलच्या चर्चा कमी झालेल्या नाहीत. त्यांच्या घटस्फोटाच्या कारणाबाबत लोक अनेक वेगवेगळे दावे करत आहेत. काही जण युजवेंद्र चहलने धनश्रीला फसवलं असं म्हणतात.

मोठा खुलासा

## गेलने आयपीएलमधील किंग्सबाबत मोठा खुलासा

# मी कुंबळेसमोर रडलो :ख्रिस गेल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएलमध्ये सर्वात जलद शतक करण्याचा विक्रम नावे असलेला ख्रिस गेलने त्याच्या आयपीएल कारकीर्दीच्या अखेरच्या वर्षातील अनुभवाबाबत मोठा खुलासा केला आहे. ख्रिस गेलने एका पॉडकास्टमध्ये खुलासा केला की जेव्हा तो पंजाब किंग्ज (PBKS) चा भाग होता तेव्हा फ्रँचायझीमध्ये त्याचा अनादर करण्यात आला होता. यामुळेच तो मानसिकदृष्ट्या खचला आणि नैराश्यात पोहोचला.**

## केएल राहुल काय म्हणाला होता?




आपल्या वादळी फलंदाजीने सर्वांना चकित करणारा आणि गोलंदाजीत विकेट्स चटकावणाऱ्या गेलने केलेल्या खुलासामुळे सर्वांचं लक्ष वेधलं आहे. 'युनिव्हर्स बॉस' म्हणून जगभरात ओळखल्या जाणाऱ्या ख्रिस गेलने शुभंकर मिश्राच्या यूट्यूब चॅनलवरील संभाषणादरम्यान सांगितलं की, २०२१ च्या हंगामात त्याला फ्रँचायझीमध्ये आदर मिळाला नाही.२०२१ च्या हंगामात संघाचे नेतृत्व भारतीय फलंदाज केएल राहुल याच्याकडे होते आणि दिग्गज फिरकी गोलंदाज अनिल कुंबळे मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी सांभाळत होते. यादरम्यान ख्रिस गेल अनिल कुंबळेबरोबर बोलताना रडत असल्याचही त्याने सांगितलं आहे.ख्रिस गेल म्हणाला, "माझी आयपीएल कारकीर्द तर वेळेआधीच संपली. पंजाब किंग्समध्ये मला थोडाही आदर मिळाला नाही. मी या स्पर्धेसाठी आणि फ्रँचायझीसाठी खूप काही केलं, पण माझ्याशी असं वागलं गेलं की मी जणू लहान मुलगा आहे. तेव्हा आयुष्यात पहिल्यांदा मला डिप्रेशनमध्ये गेल्यासारखं वाटलं. त्यामुळे जेव्हा कोणी डिप्रेशनबद्दल बोलतं, तेव्हा मला त्याबाबत थोडा फार अंदाज येतो."गेल पुढे सांगत होता की, त्यावेळी पैशापैकी जास्त त्याचं मानसिक आरोग्य जास्त महत्त्वाचं होतं. कोविड-१९ मुळे खेळाडू आधीच घाबरलेल्या स्थितीत होते, ज्यामुळे मानसिक दबाव आणखी वाढला.गेलने तत्कालीन प्रशिक्षक अनिल कुंबळेंशी याबाबत काय चर्चा केली हेही सांगितलं. गेल म्हणाला, "मी अनिलला सांगितलं की मी आता खेळू शकत नाही. त्यावेळी मला खूप मानसिक त्रास होत होता आणि विश्वचषकही जवळ आला होता. त्यात करोनामुळे कुठे बाहेरही जाऊ शकत नव्हतो. त्यामुळे मानसिक तणाव अधिक वाढत होता. मी मुंबई इंडियन्सविरूद्ध अखेरचा सामना खेळलो आणि मला असं झालं, बस्स झालं. याला काही अर्थ नाहीये. मी या अशा गोष्टींमुळे स्वत:लाच त्रास करून घेतोय."आपल्या वादळी फलंदाजीने सर्वांना चकित करणारा आणि गोलंदाजीत विकेट्स चटकावणाऱ्या गेलने केलेल्या खुलासामुळे सर्वांचं लक्ष वेधलं आहे. 'युनिव्हर्स बॉस' म्हणून जगभरात ओळखल्या जाणाऱ्या ख्रिस गेलने शुभंकर मिश्राच्या यूट्यूब चॅनलवरील संभाषणादरम्यान सांगितलं की, २०२१ च्या हंगामात त्याला फ्रँचायझीमध्ये आदर मिळाला नाही.२०२१ च्या हंगामात संघाचे नेतृत्व भारतीय फलंदाज केएल राहुल याच्याकडे होते आणि दिग्गज फिरकी गोलंदाज अनिल कुंबळे मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी सांभाळत होते. यादरम्यान ख्रिस गेल अनिल कुंबळेबरोबर बोलताना रडत असल्याचही त्याने सांगितलं आहे.ख्रिस गेल म्हणाला, "माझी आयपीएल कारकीर्द तर वेळेआधीच संपली. पंजाब किंग्समध्ये मला थोडाही आदर मिळाला नाही. मी या स्पर्धेसाठी आणि फ्रँचायझीसाठी खूप काही केलं, पण माझ्याशी असं वागलं गेलं की मी जणू लहान मुलगा आहे. तेव्हा आयुष्यात पहिल्यांदा मला डिप्रेशनमध्ये गेल्यासारखं वाटलं. त्यामुळे जेव्हा कोणी डिप्रेशनबद्दल बोलतं, तेव्हा मला त्याबाबत थोडा फार अंदाज येतो."गेल पुढे सांगत होता की, त्यावेळी पैशापैकी जास्त त्याचं मानसिक आरोग्य जास्त महत्त्वाचं होतं. कोविड-१९ मुळे खेळाडू आधीच घाबरलेल्या स्थितीत होते, ज्यामुळे मानसिक दबाव आणखी वाढला.गेलने तत्कालीन प्रशिक्षक अनिल कुंबळेंशी याबाबत काय चर्चा केली हेही सांगितलं.

### मी आता खेळू शकत नाही


मला खूप मानसिक त्रास होत होता आणि विश्वचषकही जवळ आला होता. त्यात करोनामुळे कुठे बाहेरही जाऊ शकत नव्हतो. त्यामुळे मानसिक तणाव अधिक वाढत होता. मी मुंबई इंडियन्सविरूद्ध अखेरचा सामना खेळलो आणि मला असं झालं, बस्स झालं. याला काही अर्थ नाहीये. मी या अशा गोष्टींमुळे स्वत:लाच त्रास करून घेतोय."

## शेतकऱ्याचा मुलगा झाला ५० कोटींचा मालक!

# शेतात क्रिकेटचे धडे गिरवणारा गिल कुठून कमावतो इतका पैसा?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगातील पहिल्या क्रमांकाचा वनडे फलंदाज आणि कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिल २६वा वाढदिवस साजरा करतोय. त्याच्या २६व्या वाढदिवशी गिल आशिया चषक २०२५ स्पर्धेसाठी दुबईत आहे. ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेत भारतीय संघ १० तारखेपासून युएईविरूद्ध सामन्यासह आपल्या मोहिमेला सुरूवात करणार आहे. भारताचा हा कसोटी कर्णधार तब्बल ५० कोटींचा मालक असल्याचं रिपोर्टमध्ये समोर आलंय.**



गिलच्या कमाईबद्दल सविस्तर जाणून घेऊया.शुबमन गिल हा मूळचा पंजाब राज्यातील फाजिल्का येथील आहे. शुबमन गिलचे वडील शेतकरी असून लेकाने क्रिकेटपटू व्हावं हे त्यांचं स्वप्न होतं.त्याच्या वडिलांनी शेतात एक भागात खेळपट्टी तयार केली होती,जेणेकरून शुबमन तिथे सराव करू शकेल. शुबमनला गोलंदाजी करण्यासाठी ते गावातील इतर मुलांना बोलवत असतं. जो मुलगा शुबमनला बाद करेल त्याला ते १०० रूपये भेट म्हणून द्यायचे. त्या काळात १०० रूपये मिळणं ही मोठी गोष्ट होती. त्यामुळे गोलंदाजी करणारी मुलदेखील त्याला चांगली गोलंदाजी करत असत आणि गिलचा सरावही चांगला होत असे.यानंतर पुढे जाऊन क्रिकेटपटू होण्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी गावातून बाहेर पडत शुबमनचे वडील त्याला पंजाब शहरात घेऊन आले आणि तिथे त्याने क्रिकेटचे धडे गिरवले, युवराज सिंगकडून मार्गदर्शन घेतलं. यानंतर क्रिकेटच्या मैदानावर पाऊल ठेवलं.फक्त १०० रूपयांपासून सुरू केलेला हा प्रवास आता ५० कोटींपर्यंत पोहोचला आहे. गिल आता श्रीमंत क्रिकेटपटूंच्या यादीत मोडतो आणि तो सुमारे ५० कोटींचा मालक आहे.

### कुठून कमावतो बक्कळ पैसा?

शुबमन गिल क्रिकेटसह मैदानाबाहेर मोठी कमाई करतो. गिल २० ब्रँडच्या एंडोर्समेंटमधून बक्कळ कमाई करतो.शुभमन गिलला बीसीसीआयकडून वार्षिक करारातून ५ कोटी मिळतात. तर आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सकडून १६.५० कोटी रूपये मिळतात. यासह मॅच फी आणि सामन्यातील उत्कृष्ट कामगिरीसाठी मिळणारी कमाई वेगळी आहे. ज्या २० ब्रँड्ससाठी एंडोर्स करतो

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार।
। दि. 9 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


# गवळीनगर-चक्रपाणीमध्ये भाजपा अन् राष्ट्रवादीचाही 'क्लिन स्विप'चा दावा!

## ग्राऊंड रिपोर्ट: प्रभाग क्रमांक 5 मध्ये भाजपा-राष्ट्रवादीमध्ये अतितटीची लढाई

। पिंपरी चिंचवड । अविनाश आदक : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 ची प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाली. ऑक्टोबरमध्ये हरकती आणि सूचनांची सुनावणी होईल आणि सदरची प्रभाग रचना अंतिम केली जाणार आहे. त्यानंतर आरक्षण सोडत आणि निवडणूक आचारसंहिता सुरू होईल. ही निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडीतील घटकपक्ष स्वबळावर लढवतील, असे चित्र आहे. डिसेंबरमध्ये मतदान आणि जानेवारी-2026 मध्ये महानगरपालिकेत नवीन महापौर विराजमान होतील. या निमित्ताने "महाईन्यूज" च्या माध्यमातून प्रभागनिहाय राजकीय स्थितीबाबत विश्लेषण पहिला "ग्राऊंड रिपोर्ट" प्रसिद्ध करीत आहोत.**





"गेल्या 8 वर्षांत 'गाऊंड लेव्हल'वर काम केले आहे. 20 लाख लीटर क्षमतेच्या नवीन पाण्याच्या टाक्या, वाहनतळ, भोसरी-दिघी शिव रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यावर भर दिला आहे. आमचा लोकांशी संपर्क चांगला आहे. प्रभागात विधानसभा निवडणुकीतील मताधिक्य पाहता भाजपाचे चारही नगरसेवक निवडून येतील.


**–सागर गवळी,** भाजपा.



"पिंपरी-चिंचवड शहरामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात विकासाला गती देण्यात आली. आम्ही प्रस्थापितांविरोधात लढा उभा केला. प्रभागातीलच नव्हे, तर मतदार संघातील नागरिक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पाठिशी राहतील. विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबत अनेकांनी साशंकता व्यक्त केली आहे. महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीच्या विचाराचे चारही नगरसेवक निश्चितपणे निवडून येतील.

**–अजित गव्हाणे,** राष्ट्रवादी अ.प.

2017 च्या निवडणुकीप्रमाणे प्रभाग "रचना जैसे थे" आहे. प्रभाग क्रमांक 5 मध्ये कोणताही बदल नाही. ज्याअर्थी 2017 प्रमाणे प्रभाग निश्चित झाले आहेत. त्यासाठी 2011 ची जनगनना ग्रहीत धरण्यात आली आहे. तत्कालीन जनगननेनुसार, प्रभागाची लोकसंख्या 49 हजार 539 इतकी दर्शवण्यात आली आहे. त्यापैकी 5 हजार 437 इतकी अनुसूचित जाती आणि 1 हजार 214 इतकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे.




लोकसंख्येच्या प्रमाणानुसार, 2017 मध्ये या प्रभागामध्ये भाजपाची मोठी लाट होती. मात्र, या प्रभागातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे 2 आणि भाजपाचे 2 नगरसेवक निवडून आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील अजित गव्हाणे यांचा प्रभाव असलेला हा प्रभाग म्हणून ओळखला जातो. या ठिकाणी भाजपाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांचे बंधू कामगार नेते सचिन लांडगे यांनी गव्हाणे यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. अत्यंत प्रतिष्ठेच्या या लढाईमध्ये अजित गव्हाणे यांना 10 हजार 58 मते मिळाली आणि सचिन लांडगे यांना 9 हजार 722 मते मिळाली आहेत. अवघ्या 336 मतांनी सचिन लांडगे यांचा पराभव झाला होता.

आमदार महेश लांडगे यांचे कट्टर समर्थक सागर गवळी यांनी अ- गटातून 10 हजार 610 मते मिळवत, राष्ट्रवादीच्या वसंत लोंढे यांचा पराभव केला होता, तर ब- गटातून राष्ट्रवादीच्या अनुराधा गोफणे यांनी 9 हजार 202 मते मिळवत भाजपाच्या सुलोचना भोवरे यांचा पराभव केला होता. क- गटातून भाजपा प्रियांका बारसे यांनी 9 हजार 361 मते मिळवत विजय मिळवला. त्यांनी राष्ट्रवादीच्या कोमल फुगे यांचा पराभव केला होता. ऐकेकाळी आमदार महेश लांडगे यांच्या समर्थक असलेल्या बारसे यांनी 2022 च्या महापालिका निवडणुकीपूर्वी एकत्रित राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यानंतर सध्या त्या राष्ट्रवादी शरद पवार गटात आहेत.

दरम्यान, विधानसभा निवडणूक 2024 मध्ये अजित गव्हाणे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला होता. त्यावेळी त्यांनी 'तुतारी' चिन्हावर निवडणूक लढवली. या निवडणुकीत महेश लांडगे यांनी विधानसभा विजयाची 'हॅट्रिक' केली. गव्हाणे यांच्या 'होमपीच'वर महेश लांडगे यांनी 4 हजार 200 हून अधिक मते घेतली आहेत. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत हा प्रभाग अत्यंत संवेदनशील आणि प्रतिष्ठेचा म्हणून लक्षवेधी ठरणार आहे.

2017 च्या आरक्षणानुसार, अ- नागरिकांचा मागास प्रवर्ग, ब- सर्वसाधारण महिला, क- सर्वसाधारण महिला आणि ड- सर्वसाधारण असे आरक्षण होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला 50 टक्के आरक्षण आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, ओबीसी आरक्षण पूर्ववत ठेवण्यात आले आहे. त्यामुळे आरक्षणामध्ये काही फार बदल होईल, असे चित्र नाही.V

### पक्षनिहाय इच्छुकांची नावे :

1. **भारतीय जनता पार्टी :** सागर गवळी, सचिन लांडगे, कविता भोंगाळे, सुजाता लोंढे, कविता गव्हाणे आदी.
2. **राष्ट्रवादी अ.प. गट :** अजित गव्हाणे, अनुराधा गोफणे, अमर फुगे, तुषार फुगे.
3. **शिवसेना शिंदे गट :** अद्याप कोणी नाही.
4. **राष्ट्रवादी श.प. गट :** प्रियांका बारसे.
5. **शिवसेना उबाठा गट :** राहुल गवळी.
6. **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :** अद्याप कोणी नाही.
7. **महाराष्ट्र नवनिर्माण सेना :** अद्याप कोणी नाही.

### प्रभागातील समाविष्ट भाग :

रामनगर, तुकारामनगर, गुरूदत्त कॉलनी, गंगोत्री पार्क, सावंतनगर, महादेवनगर, गवळीनगर, श्रीराम कॉलनी, ज्ञानेश्वर नगर, चक्रपाणी वासाहत आदी.

### 2017 मधील विजयी उमेदवार:

अ - सागर गवळी - भाजपा
ब - अनुराधा गोफणे - राष्ट्रवादी अ.प.
क- प्रियांका बारसे - भाजपा (आता राष्ट्रवादी श.प.)
ड - अजित गव्हाणे - राष्ट्रवादी अ.प.

## गणेशोत्सवात चोख बंदोबस्त ठेवल्याबद्दल

# महिला पोलिसांचा सत्कार!

## विधायक उपक्रम: कर्तव्यदक्ष पोलिसांच्या पुढे आदर्श

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नुकताच पार पडलेला अकरा दिवसांचा गणेशोत्सव कुठलाही अनुचित प्रकार न होता शांततेत पार पडला. या उत्सवात लाखो भाविक सहभागी झाले होते, मात्र पोलिस प्रशासनाने चोख नियोजन करून गर्दीवर अचूक नियंत्रण ठेवले. या यशामध्ये महिला पोलिसांचे योगदान विशेष ठरले.**

गणपती आगमनापासून ते विसर्जनापर्यंत प्रत्येक मिरवणुकीत महिला पोलिसांनी अत्यंत दक्षतेने आपली जबाबदारी पार पाडली. स्वतःच्या कुटुंबातील सण बाजूला ठेवत त्यांनी समाजासाठी अहोरात्र कार्य केले. अनेक महिला पोलिस पहाटे दोन वाजेपर्यंत ड्युटीवर होत्या. या समर्पणाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या कामगिरीची दखल घेत निर्मला जगताप, नीरजा देशपांडे, अनिता धाक्रस आणि माधव पाटील यांनी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून महिला पोलिसांचा सत्कार केला. या वेळी सत्कारमूर्तींना शाल, श्रीफळ आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाला वरिष्ठ पोलिस अधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



## हजरत मोहम्मद पैगंबर जयंती उत्साहात साजरी

## भव्य मिरवणुका, ऐक्याचा संदेश आणि धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**यंदाच्या गणेश उत्सवात हजरत मोहम्मद पैगंबर जयंती व गणेश उत्सव एकत्र आल्यामुळे पिंपरी चिंचवड जुलूस समितीच्या व पोलीस विभागाच्या वतीने झालेल्या बैठकीत पिंपरी चिंचवड शहरात हजरत मोहम्मद पैगंबर जयंती आज साजरी करण्याची ठरले त्याप्रमाणे आज पिंपरी चिंचवड जुलूस समितीच्या वतीने तसेच ~~इतर मशिदी , मदरसे च्या वतीने~~ पिंपरी चिंचवड शहरात मोहम्मद पैगंबर याच्या १५०० व्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड शहरात ईद - ए - मिलाद उत्साह, भक्तीभाव आणि ऐक्याच्या वातावरणात साजरी झाली.**



पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देत काढलेल्या भव्य मिरवणुकीत लहानग्या चिमुरडया निरागस मुले मुली ते वयोवृद्धांच्या श्रद्धेच्या नजरेपर्यंत सर्व रंग एकत्र मिसळलेले दिसून आले . पिंपरी चिंचवड शहरात निगडी, भोसरी, काळेवाडी, कासारवाडी, काळा खडक ,नेहरूनगर ,ओटा स्कीम, आदी भागातून मोठया संख्येने मुस्लीम बांधव मिरवणुकीच्या द्वारे एकत्र पिंपरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात एकत्र येऊन मिरवणुकीची सांगता केली. आलेल्या सर्वांचे पिंपरी चिंचवड जुलूस समितीचे अध्यक्ष रमजान अत्तार , उपाध्यक्ष नासीर शेख , सचिव अकबर मुल्ला ,खजिनदार सलीम मेमन ,सदस्य व माजी अध्यक्ष युसूफ कुरेशी ,झिशांन सय्यद, हाजी गुलाम रसूल ,शहाजी अत्तार तसेच आदींनी स्वागत केले. पिंपरी येथे पिंपरी चिंचवड जुलूस समितीच्या वतीने बिहार येथील मुस्लीम धर्मगुरू हजरत अल्लामा मौल्लाना मुफ्ती शहरयार कादरी यांचे प्रवचन संपन्न झाले त्यांनी मोहम्मद पैगंबर यांच्या जीवनावर विविध माहिती मुस्लिम बांधवांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मौलाना नय्यर नुरी यांनी तर आभार अध्यक्ष रमजान अत्तार यांनी मानले.

यावेळी राजकीय सामाजिक क्षेत्रातील सर्व धर्मीय मान्यवर उपस्थित होते. पिंपरी मिलीद नगर येथील जामा मजीद व मदरसा लतेफिया चे अध्यक्ष शहाबुद्दीन शेख, सचिव अकबर मुल्ला ,रियाज शेख , रज्जाक शेख ,मुस्तफा अहमद, हबीब शेख आदी मुस्लिम बांधवानी भव्य अली की तलवार चा देखावा सादर केला . अनेक ठिकाणी , पाणी , शरबत , मिठाईचे वाटप करण्यात आले.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 - 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046